महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

भामा आसखेळ प्रकल्पातील दौंड, शिरुर, खेड व हवेली (जि.पुणे) तालुक्याच्या पाण्याचा कोटा राखीव ठेवण्याबाबत

(१) २८२३७ (१७-११-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा आसखेळ प्रकल्पातील दौंड, शिरुर, खेड व हवेली तालुक्याचे हक्काचे पाण्याचा कोटा राखीव ठेवण्याबाबत तसेच सदर प्रकल्पासाठी आरक्षित जमिनी शेतकऱ्यांना परत करुन प्रकल्प ग्रस्तांच्या पुनर्वसनाची जबाबदारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांना देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच भामा आसखेड प्रकल्पाचे पाणी प्रकल्पाच्या उद्देशानुसार दौंड, शिरुर, खेड हवेली तालुक्यातील शेती सिंचनासाठी राखीव ठेवण्याबाबत व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची जबाबादारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१७) : (१) होय.

(२) व (३) पुनर्वसन अधिनियम, १९९९ कलम १३५(५)(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने १९६४५ हेक्टर क्षेत्र, लाभक्षेत्रामधून वगळण्याबाबतचा प्रस्ताव, जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

भामा आसखेड प्रकल्पाचे, पिण्याच्या वापरासाठी शासनाकडून आरक्षित झालेले पाणी वगळता, शिल्लक पाणी शेती सिंचनासाठी भामा नदीत सोडण्याचे नियोजन आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडील दि. १३/६/२०१६ रोजीचे पत्रान्वये प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मुंबई यांना सादर करणेत आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे येथील नकाणे व डेडरगाव तलावाची साठवण क्षमता वाढविण्याबाबत

(२) ३३५६१ (१५-०१-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील नकाणे व डेडरगाव तलावाची उंची ५ मीटरने वाढवून तलावाची साठवण क्षमता १००० ते १२०० दलघफु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांनी पत्रव्यवहार करुनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नकाणे व डेडरगाव तलावाची उंची ५ मीटरने वाढविण्याबाबत शासन स्तरावर विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत कधीपर्यंत कार्यवाही होण्याचे अपेक्षित आहे व त्याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दि. ०९/०२/२०१५ च्या पत्राबाबत शासनाच्या दि. १५/०३/२०१६ च्या पत्रान्वये वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.

नकाणे धरणाची उंची ५ मी. नी वाढविण्याकरिता आवश्यक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासानुसार उंची वाढीकरिता आवश्यक पाणी उपलब्ध नाही. त्यामुळे नकाणे धरणाची उंची वाढविण्याबाबतची विनंती अमान्य करण्यात येत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले आहे.

तसेच धुळे महानगरपालिकेच्या विनंती नुसार डेडरगाव तलावाची उंची वाढविणे संदर्भात क्षेत्रिय स्तरावर प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) क्षेत्रिय स्तरावरुन प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यावर आवश्यक ती उचित कार्यवाही निधी उपलब्धता व प्रस्तावाची व्यावहारीकता विचारात घेऊन करणे नियोजीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पांझरा व कान नदीवर आणि बुराई नदीवरील वासदरे, ब्राम्हणतेल इत्यादी बंधाऱ्याची पाणी क्षमता कमी झाल्याबाबत

(३) ४७०४८ (०३-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पांझरा व कान नदीवर आणि बुराई नदीवरील वासदरे, ब्राम्हणतेल इत्यादी ठिकाणी शिवकालीन फड पध्दतीचे जूने बंधारे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्यांपैकी सुमारे नव्वद टक्के बंधारे गाळ, रेती, मातीने भरल्याने सदर बंधाऱ्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाल्यामुळे परिणामी सिंचन क्षेत्रही कमी झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलशिवार अभियान योजनाअंतर्गत सदर बंधाऱ्यातून गाळ, रेती, माती उपसण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय.

साक्री तालुक्यात पांझरा, कान व बुराई नदीवर फड पध्दतीने बंधारे आहेत.

(२) सदर बंधाऱ्यांकडे काही प्रमाणात गाळ साठला असून त्यामुळे साठवण क्षमता कमी होऊन सिंचनावर परिणाम झालेला आहे.

(३) सदर बंधाऱ्यांमधील साठलेला गाळ काढण्याबाबत प्रचलित शासन धोरणानुसार कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील नदीतील वाळु उपसा रोखण्याबाबत

(४) ४९७५१ (२५-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील मुळा धरणातून जायकवाडी पाणी सोडले असून वाळू उपशामुळे नदीपात्रात मोठे खड्डे पडले असल्याने पाण्याला अडथळे पार करतांना वेग बराच कमी झाला होता त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नदीतील वाळू उपासा रोखल्यास नदी वाहती होईल व त्याचा फायदा नदीकाठच्या शेतकऱ्यांना होणार असून शेतीसाठी डाव्या कालव्याचे आवर्तन काही प्रमाणात होऊ शकते तसेच उजव्या कालव्याचे आवर्तन धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

मुळा धरणातून दि. ०१/११/२०१५ ते दि. २८/११/२०१५ या कालावधीत जायकवाडीसाठी पाणी सोडण्यात आले नदीपात्रातील खड्डे भरल्यानंतर पाणी पुढे गेले आहे. त्यामुळे वहन कालावधी वाढला आहे.

(२) नाही.

मुळा उजव्या कालव्यातून दि. २२/११/२०१५ ते दि. ०५/०१/२०१६ च्या दरम्यान आवर्तन सोडण्यात आले.

(३) राहुरी तालुक्यातील मुळा नदीपात्रामधील वाळुचे अनधिकृत उत्खनन व वाहतुक रोखण्याकामी तालुकास्तरावर भरारी पथके गठित करण्यात आली होती. सदर भरारी पथकांमार्फत वाळूच्या अनधिकृत वाहतुकीबाबत सन २०१५-१६ मध्ये ६९ प्रकरणांत तर सन २०१६-१७ मध्ये ३८ प्रकरणात कारवाई करण्यात येवून रु. ४१,९६,४००/- दंड वसूल करणेत आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जलाशयांमध्ये कमी पाणी साठा उपलब्ध असल्याबाबत

(५) ५०८९४ (०३-०५-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलाशयांमध्ये गेल्या आठ वर्षाच्या तुलनेने सर्वात कमी म्हणजेच केवळ ४७ टक्के पाणी साठा उपलब्ध असल्याने माहे जुलै, २०१६ पर्यंत पाणी टंचाई निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलाशयांमध्ये पाणी साठा कमी असल्याने राज्यात सर्वत्र पाणी कपात विशेषत: मुंबई, ठाण्यात सध्या १५ ते २० टक्के पाणी कपात असली तरी माहे मार्च, २०१६ नंतर हे प्रमाण वाढवावे लागेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागांतर्गत असलेल्या मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पात दि. ३१/०७/२०१६ रोजी एकूण ४४% पाणीसाठा शिल्लक होता.

(२) होय.

(३) मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पांमध्ये जुलै अखेर पर्यंत पिण्यासाठी आवश्यक पाणीसाठा राखून ठेवण्यात येत असून, पिण्यासाठी पाणी टंचाई उद्भवणार नाही याची दक्षता घेवून नियोजन करणेत आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मा.उच्च न्यायालयाने दुष्काळग्रस्त भागांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत दिलेले आदेश

(६) ५५३९४ (१०-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाणी ही राष्ट्रीय संपत्ती असून त्यांच्यावर कुणी कंपनी वा व्यक्ती आपली मक्तेदारी सांगू शकत नाही असे स्पष्ट करीत राज्यातील खाजगी मालकीची धरणे, विहिरी आणि विंधन विहिरीतून दुष्काळग्रस्त भागांसाठी पाणी टंचाईची समस्या दूर होईपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५४/२०१५ व इतर संबंधित याचिकांच्या संदर्भात दि. २४/५/२०१६ रोजी दिलेल्या आदेशातील परि. १४ नुसार खाजगी व्यक्ती अथवा कंपनीच्या अधिपत्याखालील धरणातील पाणी उपलब्धता तपासण्याचे व सदर धरणातील उपलब्ध पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी वापरले जाणार याची खात्री करण्याचे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास दिले.

(२) राज्यातील विहिरी व विंधन विहिरीतील पाण्यांसंबंधाने तसेच दुष्काळग्रस्त भागातील पाणी टंचाईची समस्या निवारण करण्यासंबंधाने महसूल व वन विभागाने त्यांच्या दि. ०७/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील विविध धरणातील पाणीसाठा पुरेसा पाऊस पडेपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी राखुन ठेवण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना दिलेले आहेत.

मा.उच्च न्यायालयाच्या दि. २४/०५/२०१६ च्या आदेशानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी राज्यातील खाजगी धरणांचे मालक व पाचही पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक यांच्या समवेत सुनावणी घेतली व राज्यातील खाजगी धरणांची पाणी उपलब्धता व वापराबाबतच्या माहितीच्या आधारे शपथपत्र दाखल केले असून त्याबाबत न्यायालयीन प्रक्रिया मा.उच्च न्यायालय मुंबई येथे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मद्‌यकंपन्यांना देण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये पाणीकपात करण्याबाबत

(७) ५५९६२ (२९-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पिण्याच्या पाण्याचा दर लिटरला ३८ पैसे तर मद्यनिर्मिती कंपन्यांना लागणाऱ्या पाण्याचा दर केवळ ४ पैसे प्रतिलिटर दिले जात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दुष्काळ परिस्थिती असताना मद्यकंपन्यांना पाणीकपातीचा निर्णय घेण्यात आला होता परंतू त्यांची अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील बारा जिल्हयात मद्यनिर्मिती करणाऱ्या उद्योगांचे ६० टक्के तर अन्य उद्योगांचे २५ टक्के पाणी कपात करण्याचे अंतरिक आदेश शासनाला दिले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.न्यायालयाच्या या आदेशानुसार मद्यकंपन्यांना देण्यात येणाऱ्या पाण्यामध्ये पाणीकपात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०७-०७-२०१७) : (१) नाही.

राज्यातील औद्योगिक, घरगुती व कृषी सिंचनाच्या वापरकर्त्यांसाठी घनमापक पध्दतीने पुरवावयाच्या पाणीपट्टीचे प्रचलीत दर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि. ३०/५/२०११ च्या आदेशानुसार आहेत. हे दर दि. २९/०६/२०११ च्या शासन निर्णयान्वये लागू केले आहेत. यानुसार घरगुती पाणीपट्टीचे दर पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतानुसार ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकरिता वेगवेगळे असून कमीत कमी दर ०.००४४ पैसे प्रती लिटर व जास्तीत जास्त दर ०.०४२ पैसे प्रती लिटर असे आहेत. हे दर स्थानिक उपकर वगळून आहेत.

औद्योगिक पाणीपट्टीचे दर पाणी पुरवठ्याच्या स्त्रोतानुसार पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होतो किंवा प्रक्रियेसाठी वापर होतो यावर अवलंबून असून कमीत कमी दर ०.१०७ पैसे प्रती लिटर व जास्तीत जास्त दर ३.२ पैसे प्रती लिटर असे आहेत. हे दर स्थानिक उपकर वगळून आहेत.

याशिवाय दि. ३०/५/२०११ च्या आदेशात विशिष्ठ कारणासाठी सवलतीचे व दंडात्मक दर देखील नमुद केले आहेत.

(२) नाही.

सदर २०१६ च्या दुष्काळात जिल्हाधिकारी तसेच मा.न्यायालयाच्या आदेशान्वये मद्य निर्मिती कंपन्यांना पाणी कपातीचा निर्णय घेण्यात आला. जलसंपदा विभाग महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांना (MIDC) पाणी पुरवठा करते. त्यानुसार या महामंडळाने पाण्याचे पुढील वितरण करताना या निर्णयाची अंमलबजावणी केली आहे.

(३) होय.

मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि. २७/०४/२०१६ रोजीच्या अंतरीम आदेशानुसार सर्वसाधारण कारखान्यांना २५% पर्यंत व मद्यनिर्मिती उद्योगांसाठी ६०% पर्यंत दोन टप्प्यात पाणीकपात करण्याचे आदेश दिले आहेत.

(४) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार मद्य कंपन्यांसाठी दि. २७/०४/२०१६ पासून ५०% व दि. १०/०५/२०१६ पासून ६०% पाणीकपात करण्यात आली होती. सदर कपात धरणात पुरेसा पाणीसाठा निर्माण झाल्यानंतर रद्द करण्यात आली आहे.

पाण्याचे कंपन्यांना प्रत्यक्ष वितरण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळांमार्फत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील शासन पाटबंधारे विभाग प्रकल्पातील धरण व कालवेलगत जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

(८) ५९५२१ (२०-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील पाटबंधारे विभाग प्रकल्पातील धरण व कालवेलगत जमिनीत अनेक ठिकाणी छोटे-मोठे कालवे, पाटबंधारे नष्ट करुन कंपन्या, बिल्डींग, बंगले बांधून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार अतिक्रमण केलेल्या दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी चौकशी केलेली नाही. तथापि, क्षेत्रिय पाहणीअंती पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालव्यावरील पालघर शाखा क्र. २ च्या थेट लघुपाट क्र. ९ तसेच डावा तील कालव्यावरील थेट लघुपाट क्र. १३, १८, १९ वर अतिक्रमण झाल्याचे तसेच वांद्री मध्यम प्रकल्पांतर्गत डावा तीर कालव्याच्या गांजे लघुपाट क्र. २ व ढेकोळे लघुपाट क्र. ३ च्या पुच्छ भागात अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरहू अतिक्रमण दूर करण्याच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर (पालघर) यांनी सर्व दोषींना नोटीस बजावली आहे.

तसेच महाराष्ट्र सिंचन कायदा, १९७६ मधील कलम १९ अन्वये संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली असून विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सर्व संबंधितांकडून अतिक्रमण निर्मूलन करुन आवश्यक तेथे दंडात्मक कारवाई करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील जीर्ण झालेल्या सुमारे १५ के.टी.वेअर्सच्या (लघु पाटबंधारे) दुरुस्तीचे काम करण्याबाबत

(९) ६३२२२ (२९-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील सुमारे १५ के.टी.वेअर्स (लघु पाटबंधारे) अत्यंत जीर्ण झाले असल्याने त्यांच्या दुरुस्तीची मागणी मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू लघु पाटबंधारेच्या दुरुस्तीचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

तथापि कोल्हापूर पध्दतीचे बंधारे हे जुने असल्यामुळे त्यांना किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता आहे.

(२) व (३) दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर दुरुस्तीचे काम करण्याबाबतची कार्यवाही करणे नियोजित आहे.

उर्ध्व पैनगंगा इसापूर उजवा कालवा दुरुस्तीसाठी निधी देण्यासह गोदावरी उजवा व डावा कालवा पुर्ण करण्याबाबत

(१०) ६५२६६ (०२-०१-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील उर्ध्व पैनगंगा इसापूर उजवा कालवा दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ सिंचन भवन, औरंगाबाद येथे लोकप्रतिनिधीनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच अहमदनगर जिल्हयातील गोदावरी उजवा व डावा कालवा यांचे मजबुतीकरण व नुतनीकरण करण्याची कामे शासनाने सन १९८३ पासून हाती घेतलेली असतानाही ती अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसून मागील ३३ वर्षात फक्त ४५ % कामे पूर्ण झाली असल्याचे व अद्यापहि ५५ % कामे अपुरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील निवेदनाच्या अनुषंगाने कालवाच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याबाबत व अहमदनगर जिल्ह्यातील गोदावरी उजवा व डावा कालवा यांचे मजबुतीकरण व नुतनीकरणाच्या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) हे खरे आहे,
(२) सन १९८६ पासून रोहयो मधून सदर कामातील मातीकामाची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात आली आहे.

सन १९९४ मध्ये नूतनीकरणाच्या कामास मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. सद्य:स्थितीत नूतनीकरण व आधुनिकीकरणांतर्गत ४२८२ सघमी पैकी २८२६ सघमी (६६ टक्के) मातीकाम पूर्ण झाली आहेत. ३६४ बांधकामांपैकी १२१ बांधकामे प्रगतीपथावर असून यापैकी ७२ बांधकामे पूर्ण व ४९ प्रगतीपथावर आहेत.

शासन निर्णय क्र. सुप्रमा-२००९/(२०७/०९)/सिं.व्य.(कामे), दि.०६/१२/२०१६ अन्वये गोदावरी कालवे आधुनिकीकरणाच्या कामास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उर्ध्व पैनगंगा इसापूर कालव्याच्या क्षतिग्रस्त कामांसाठी रु. ५ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच गोदावरी उजवा व डावा कालव्यांचे मजबूतीकरण व नूतनीकरणाच्या कामांसाठी आवश्यकतेनुसार क्षेत्रिय अधिकाऱ्यांना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१७-१८ च्या आर्थिक वर्षात तरतूद करण्यात आली आहे.

उपलब्ध निधीनुसार कामे करण्यात येत असल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोकर (जि.नांदेड) तालुक्यात बेंबर येथील दोन जुन्या तलावांची झालेली दुरवस्था

(११) ६८१३६ (०६-०१-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात बेंबर येथील दोन जुन्या तलावांकडे लघुपाटबंधारे विभाग दुर्लक्ष करीत असल्याने या तलावांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तलावावर किरकोळ खर्च झाला तरी परिसरातील सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन तलावातील गाळ काढून त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) या दोन्ही तलावातील गाळ सन २०१६ मध्ये लोकसहभागातून काढण्यात आलेला आहे. हे दोन्ही तलाव २५० हे. पेक्षा कमी क्षमतेचे असल्याने त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता ते जलसंधारण महामंडळाकडे हस्तांतरीत करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पथ्रोट-पारडी, गोंदवाघोली-सोनापूर व तळेगाव-निमगव्हान (जि.अमरावती) रस्त्यावरील पुलाची व रस्त्याची झालेली दुरवस्था

(१२) ६८१८६ (१६-१२-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव-निमगव्हाण (जि.अमरावती) रस्ता ९ कि.मी. लांबीचा असून या दोन भागात चार वर्षापुर्वी डांबरीकरण झाले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच अमरावती जिल्हयातील पथ्रोट सर्कलच्या अंर्तगत पथ्रोट ते पारडी रस्ता, गोंदवाघोली ते सोनापूर रस्ता याठिकाणी लहान लहान पुलावरील दोन्ही बाजुना मोठे तडे जाऊन काही भाग कोसळल्याने रहदारीला धोका निर्माण झाला असताना याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरपुलाची व रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे (०३-०७-२०१७) : (१) होय, हे खरे आहे. तळेगाव ते निमगव्हाण ग्रामीण मार्ग क्र.५७ या रस्त्याची एकूण लांबी ८.०० कि.मी. आहे. या संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम मंडळ अमरावती अंतर्गत विशेष प्रकल्प विभाग यांच्यामार्फत करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही. पार्डी ते पथ्रोट या ग्रामीण मार्ग क्र.१९ या रस्त्यावरील सा.क्र.१२/०० मधील मोरी बुजल्यामुळे नाल्यातील पाणी रस्त्यावरुन वाहुन गेल्यामुळे रस्त्याचा भराव वाहून गेला होता, तथापि, भराव भरण्यात आला असून सद्यस्थितीत रहदारीला अडचण नाही.

गोंडवाघोली ते सोनापुर ग्रामीण मार्ग क्र.६ या रस्त्याची लांबी सुस्थितीत असून चिखलदरा तालुकाअंतर्गत येणाऱ्या सोनापुर गोंडवाघोली या ग्रामीण मार्ग क्र.११७ वरील सा.क्र.२/७०० वरील मोरीचा उजव्या बाजूकडील वाहून गेलेला भराव भरण्यात आला असून

सद्यस्थितीत वाहतुक सुरु आहे. सन २०१७-१८ च्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सदर रस्त्यावर लहान पुल प्रस्तावित करण्यात आला असून निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे लाळी खु. (ता.जळकोट) येथील साठवण तलावास पाणी प्रमाणपत्र देण्याबाबत

(१३) ७१६७३ (०२-०१-२०१७). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लाळी खु. ता.जळकोट येथील साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळावे यासाठी लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवर्षण प्रवर्ग क्षेत्रात मोडणाऱ्या जळकोट तालुक्यातील पाणी टंचाई लक्षात घेता पाणी प्रमाणपत्र उपलब्ध देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) होय.
(२) लाळी (खु) साठवण तलाव हा प्रकल्प लेंडी उपखो-यात असून जलसंधारण विभागाकडील आहे.मुख्य अभियंता जलविज्ञान व नियोजन, नाशिक यांचे कडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र करण्याबाबतची कार्यवाही मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांचेकडून प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यातील विविध विकास कामांबाबत

(१४) ७१९०० (२७-०१-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्याच्या अनुशेष तसेच विविध प्रश्न आणि मागण्यासंदर्भात दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी मंत्रीमंडळाची बैठक झाली सदर बैठकीत नांदेड जिल्हयातील लेंडी धरण पुर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता असतांना त्याचा कोणताही उल्लेख केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) लेंडी प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम प्रकल्पग्रस्तांनी "आधी पुनर्वसन मग धरण" ही प्रमुख मागणी व इतर विविध मागणीच्या अनुषंगाने दि.६/४/२०११ पासून बंद केले आहे. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि.२२/०८/२०१४ रोजी घेतलेल्या बैठकीत मौजे-मुक्रमाबाद वगळता सर्व गावांचे पुनर्वसन करण्यात यावे आणि धरणात अंशत: पाणीसाठा करण्यात यावा. तसेच स्वेच्छा पुनर्वसनाबाबत सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यावर प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार निश्चित करण्यात येईल, असे निर्देश दिले आहे. यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आणि पुनर्वसनाकरीता आवश्यक भूसंपादनाबाबत कार्यवाही प्रगत आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१७-१८ करीता रु.५०.०० कोटी तरतूद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला पाटबंधारे विभागाअंतर्गत येणाऱ्या काटेपूर्ण प्रकल्पाच्या उद्यानाची विभागाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाल्याबाबत

(१५) ७२३९१ (०६-०१-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला पाटबंधारे विभागाअंतर्गत येणाऱ्या काटेपूर्ण प्रकल्पाच्या उद्यानाची विभागाच्या दुर्लक्षामुळे दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पर्यटनस्थळात सोयी सुविधांचा अभाव असल्यामुळे पर्यटकांची संख्या कमी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या उद्यानाकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत व उद्यानाचे पुर्ननिर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) : (१) नाही.
(२) पर्यटनस्थळी सोयी सुविधांचा अभाव नाही. परंतू दुष्काळ, पाणी टंचाईची परिस्थिती, वन विभागाकडून जलाशयात बोटींग करतांना नाकारण्यात आलेली परवानगी, वीजेचे भारनियमन व शेगाव येथील आनंद सागर हे पर्यटन केंद्र सुरू झाल्यामुळे पर्यटकांची संख्या कमी झाली.
(३) पर्यटकांची संख्या कमी झाल्याने उद्योजकास नुकसान झाल्यामुळे उद्योजकाने उद्यानाकडे दुर्लक्ष केले आहे.

उद्योजकाकडून उद्यान व इमारती महामंडळाच्या ताब्यात घेण्यात येत आहे. उद्यानाला पर्यटकांचा प्रतिसाद नसल्याने सद्यस्थितीत पुनर्निर्माण करणे योग्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राळेगाव (ता.राळेगाव) बेबंळा प्रकल्पाच्या अपूर्ण कालव्यामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत

(१६) ७२६०९ (०२-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगांव शहराच्या आजुबाजुला व लगतच्या बेबंळा प्रकल्पाच्या कालव्याच्या निकृष्ट व अपूर्ण बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याच्या निकृष्ठ बांधकाम तसेच अपूर्ण बंधाऱ्यामुळे कालव्यात पाणी साचुन ते शेतात पाझरले आणि शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीअंती बेबंळ प्रकल्पाच्या कालव्याचे निकृष्ट व अपूर्ण काम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) या भागात दिनांक ९ जुलै,२०१६ रोजी ९७ मि.मि. व दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी ८२ मि.मि. इतका पाऊस झाला असून पिकाचे नुकसान पावसाच्या पाण्यामुळे झाल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापी, शेतकऱ्यांच्या तक्रारी अर्जाप्रमाणे यांत्रिकी विभागाच्या मशिनरीच्या सहाय्याने कालव्याची तसेच निचरा नाल्याची साफ सफाईचे काम तातडीने करुन घेण्यात येत आहे. जेणेकरुन शेताचे नुकसान होणार नाही.

रत्नागिरी जिल्हयातील गडनदी प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१७) ७३८२२ (१७-०४-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील गडनदी प्रकल्पासाठी शासनाने आतापर्यंत ६५१ कोटी रूपये खर्च केले असतानाही, अद्यापी प्रकल्प अपूर्णावस्थेत असून हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अजून २०५ कोटी रूपयांची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच केंद्रिय जल आयोगाच्या पथकाने दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास प्रकल्पाची पाहणी करुन आढावा घेवून पथकाच्या पाहणी अहवालानुसार या प्रकल्पाची सर्व कामे सन २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आलेले असून सदर गडनदी प्रकल्पाचा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्प लवकर पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (३०-०६-२०१७) : (१) गडनदी प्रकल्पावर आतापर्यंत रू. ७६३.६४ कोटी खर्च झाला असून चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी राज्य तांत्रिक सल्लागार समितीस रू. ९२३.५४ कोटीचा प्रस्ताव सादर केला असून अंदाजे रू. १५९.९० कोटीची आवश्यकता आहे.

(२) होय.

(३) गडनदी प्रकल्पाची कामे शीघ्र गतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर प्रकल्पाचा समावेश प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत करण्यात आला असून निधी उपलब्धतेनुसार माहे डिसेंबर २०१९ पर्यंत प्रकल्पीय सिंचन निर्मितीसह प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कासारी नदीवरील करंजफेण ते पाल पूलाची उंची वाढविण्याबाबत

(१८) ७४०२८ (१७-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी तालुक्यातील कासारी नदीवरील करंजफेण ते पाल बंधाऱ्यास २५ वर्षे पूर्ण झाली असून सदर पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात पुलावरून पाणी जात असल्याने आजुबाजूच्या परिसरातील गावांचा व वाड्या वस्त्यांचा तालुक्याशी संपर्क तुटत असल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची पाहणी केली आहे काय व पाहणीवरुन कासारी नदीवरील करंजफेण ते पाल पूलाची उंची वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) व (२) नाही.
कासारी नदीवर सन १९८२ मध्ये करंजफेण को.प.बंधारा बांधण्यात आला आहे. मूळ संकल्पनेनुसार बंधारा बांधण्याचा उद्देश मान्सूनोत्तर पाणीसाठा करुन तो सिंचनासाठी व बिगरसिंचनासाठी वापरणे असा आहे. नियमित वाहतुकीसाठी सदर बंधारा बांधण्यात आलेला नाही. को.प.बंधाऱ्याच्या मूळ संकल्पनेनुसार बंधारे पावसाळयामध्ये अल्प कालावधीकरिता बुडीत होतात. सदर बंधाऱ्याची पाहणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी केली असता बंधाऱ्याच्या स्तंभाचे बांधकाम कमकूवत झाले असल्याचे व दगडी स्तंभ क्र.०१ ढासळला असल्याचे निदर्शनास आले. सदर को.प.बंधा-याच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

धुळे जिल्हयातील सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेत मोरदड, खोरदड आणि मोरदंड तांडा गावांचा समावेश करण्याबाबत

(१९) ७४७२० (२०-०४-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेत धुळे तालुक्यातील मोरदड, खोरदड आणि मोरदंड तांडा गावांचा समावेश करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना लेखी पत्राद्‌वारे दिनांक २ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्रावर निर्णय घेऊन सदर गावांचा या योजनेत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) होय.
(२) व (३) सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या मूळ मंजूर प्रकल्प अहवालानुसार लाभक्षेत्रात धुळे जिल्हयातील शिंदखेडा तालुक्यातील ४८ व धुळे तालुक्यातील २३ गावांचा समावेश आहे. मागणी करण्यात आलेल्या मोरदड व खोरदड गावांचा समावेश वरील गावांमध्ये नाही. तसेच या गावांचा नव्याने लाभक्षेत्रात समावेश करण्यासाठी उपसा सिंचन योजनेच्या मंजूर जलनियोजनात आवश्यक अतिरिक्त पाण्याची तरतूद उपलब्ध नाही. त्यामुळे या गावांचा समावेश सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात समावेश करता येत नाही.

धामोड (जि.कोल्हापूर) येथील तुळशी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या तुळशी कॉलनीची झालेली दुरवस्था

(२०) ७६२६२ (१७-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामोड (जि.कोल्हापूर) येथील तुळशी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कॉलनीची मोठया प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कॉलनीची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास,तद्नुसार सदर कॉलनीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) होय.
(२) होय. संबधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे.
(३) सन १९७८ मध्ये तुळशी धरण पूर्ण झाल्याने कॉलनीमध्ये धरण व्यवस्थापनासाठी असणाऱ्या चौकिदार /मजूर याखेरीज कोणीही कर्मचारी/अधिकारी यांनी राहण्याची गरज नसल्याने कॉलनीची आवश्यकता नाही.त्यामुळे कॉलनीची दुरुस्ती करण्यात आलेली नाही व प्रस्तावित ही नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राधानगरी आणि करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तुळशी धरणाला लागलेली गळती

(२१) ७६२६४ (२०-०४-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी व करवीर (जि.कोल्हापूर) तालुक्यात असलेल्या तुळशी धरणाला तीन वर्षापासून गळती लागली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर धरणाची पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, तद्नुसार सदर धरणाची गळती थांबविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) व (२) अंशत: खरे आहे.
धरणाची पर्जन्योत्तर पहाणी केली असून सांडव्याच्या वक्रदरवाज्याच्या रबरसीलमधून अत्यल्प प्रमाणात गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) सांडव्याच्या वक्रदरवाज्यांची रबरसील बदलणेचे काम मे २०१७ अखेरपर्यंत यांत्रिकी विभागामार्फत करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्हयातील विष्णुपूरी प्रकल्पातील पाणी रब्बीसाठी देण्याबाबत

(२२) ७६२८८ (१५-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील विष्णुपूरी प्रकल्पातून पाणीपाळयांचे नियोजन पाटबंधारे विभागाकडून केले जात नसल्याने विष्णुपरी विभागातील शेतकरी अडचणीत सापडला असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विष्णुपूरी प्रकल्पातील पाणी रब्बीसाठी देण्यात येणार आहे परंतू या पाणीपाळयाचे नियोजन अद्यापही पाटबंधारे विभागाने केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार पाणीपाळ्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ४०० धरणे धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

(२३) ७७४९१ (१५-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ४०० धरणे असुरक्षित असल्याचा अहवाल महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) सादर केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात सदरहू धरणाची तात्काळ दुरुस्ती करण्याची शिफारस करण्यात आल्यात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेरी या संस्थेने सादर केलेल्या अहवालाची शासनाने तातडीने दखल घेऊन राज्यातील असुरक्षित असलेल्या धरण्यांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) नाही. धरण सद्यस्थिती अहवाल-२०१५ (शासनास जुलै, २०१६ मध्ये सादर) नुसार फक्त आंबेघर, ता.पेण, जि.रायगड ही लघु पाटबंधारे योजना ही संवर्ग-१ त्रुटीमध्ये समाविष्ट आहे.

(२) नाही. आंबेघर धरणाची दुरूस्ती तात्काळ करणेची शिफारस करणेत आली आहे व इतर धरणांचे बाबतीत त्रुटींच्या गांभीर्यानुसार प्राधान्यक्रमाने दुरूस्ती करणेबाबत शिफारस करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) धरण सुरक्षितता संघटनेने नमूद केलेल्या त्रुटींचा अहवाल क्षेत्रिय मुख्य अभियंता यांना पाठविण्यात येतो व क्षेत्रिय अधिकाऱ्यामार्फत दुरूस्तीची कार्यवाही केली जाते. त्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

आंबेघर, जि. रायगड या धरणाच्या ३ त्रुटी निराकरणासाठी क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

कोल्हापूर जिल्हयातील आंबेओहोळ, सोनुर्ले, धामणी, उचंगी, नागणवाडी, दूधगंगा, वारणा प्रकल्प निधी अणि भूसंपादनाविना प्रलंबित असल्याबाबत

(२४) ७७८७० (१५-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील आंबेओहोळ, सोनुर्ले, धामणी, उचंगी, नागणवाडी, दूधगंगा, वारणा असे अनेक प्रकल्प निधी अणि भूसंपादनाविना प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांना तातडीने निधी उपलब्ध करुन प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) आंबेओहोळ, धामणी, उचंगी, नागनवाडी या ४ प्रकल्पांची कामे मुख्य:त्वे पुनर्वसनाच्या अडचणीमुळे प्रलंबित आहेत.

दुधगंगा प्रकल्पाच्या कालव्याची कामे भूसंपादन व पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहेत. वारणा प्रकल्पाच्या कालव्याची कामे पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहेत. सोनुर्ले प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी प्रलंबित आहे.

(२) सदर ७ प्रकल्पांना सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये एकूण रू.१०१.३० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. निधी उपलब्धतेनूसार या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बहुसंख्य सिंचन प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२५) ७७८९५ (१५-०४-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील बहुसंख्य सिंचन प्रकल्पांची कामे अपूर्णावस्थेत असून त्यात जामखेडी प्रकल्प धरण पूर्ण आहे, परंतु मुख्य कालवा व पाटचारीची कामे अपूर्ण आहेत, तसेच काव-याखडक लघु प्रकल्प धरण पूर्ण आहे, परंतु कालव्याचे काम अपूर्ण आहे, ही सद्यस्थिती असूनही सदरची कामे जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभागाकडून पूर्ण केली नसल्याचे वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार अपूर्ण असलेल्या धरणप्रकल्पांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) नाही. जामखेडी व काबऱ्याखडक प्रकल्पाच्या धरण व कालव्याचे काम १००% पूर्ण झाले आहे. जामखेडी प्रकल्पाच्या वितरण व्यवस्थेचे उर्वरित २०% काम तसेच काबऱ्याखडक ल.पा. योजनेच्या वितरीका क्र.२, ३ व ४ चे काम भूसंपादनाच्या अडचणीमुळे सद्य:स्थितीत बाकी आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जामखेडी प्रकल्प पूर्ण होण्याकरिता उर्वरित वितरण व्यवस्थेसाठी आवश्यक भूसंपादनाचे प्रस्ताव सुधारित भुसंपादन कायद्यानुसार सन २०१५ साली जिल्हाधिकारी, धुळे यांना पाठविण्यात आले असून भूसंपादन कार्यवाही प्रगतीत आहे.

काबऱ्याखडक प्रकल्पाचे लाभधारक अल्पभूधारक आदिवासी असून वितरिकांच्या कामामुळे क्षेत्र कमी होऊन जमिनीचे तुकडे होतील या कारणामुळे भुधारकांचा कामास तीव्र विरोध असल्याने सद्य:स्थितीत वितरिकांची कामे हाती घेणे शक्य झालेले नाही.

(४) वरील प्रमाणे वस्तुस्थिती असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

रिठठा (ता.भोकर, जि.नांदेड) येथील तलावाच्या पाळूच्या काठावरुन पाण्याची गळती होत असल्याबाबत

(२६) ७८४११ (१७-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिठठा (ता.भोकर, जि.नांदेड) येथील तलावाच्या पाळूच्या काठावरुन पाण्याची गळती होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदा पावसाचे प्रमाण आवश्यक प्रमाणात झाल्याने उक्त तलाव काठोकाठ भरला असुन या तलावातील पाण्याचा वापर रब्बी पिकांसाठी होऊ शकतो परंतु या तलावाच्या पाणी गळतीमुळे या तलावातील पाणीसाठा दिवसेदिवस लाखो लिटरने कमी होत आहे यामुळे शेतकऱ्यांना आवश्यक त्या प्रमाणात पाण्याचा शेतीकरिता वापर होत नाही तसेच वन्यजीवही आपली पाण्याची तहान भागविण्यासाठी या तलावावर येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तलावाच्या पाळूच्या काठावरील पाण्याची गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे.
या तलावाच्या सांडव्याच्या दगडी बांधकामातून गळती होत आहे.
(२) पाझर तलाव असल्यामुळे शेतकऱ्यांना अप्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळालेला आहे.
(३) रिठ्ठा (ता.भोकर, जि.नांदेड) पाझर तलावाचे काम १९९२ ते २००२ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आले आहे. तथापि, हा पाझर तलाव स्थानिकस्तर (जि.प.) पातळीचा असल्याने व्यवस्थापनासाठी तो जलसंपदा विभागाकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणे नियोजित असून त्याची देखभाल दुरूस्ती जिल्हा परिषदेकडून अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

'दमणगंगा-पिंजाळ' आणि 'पार-तापी-नर्मदा' या दोन्ही राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पांचा सामंजस्य करार अंतिम न करण्याबाबत

(२७) ७८९८७ (१७-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दमणगंगा व नारपार, औरंगा, अंबिका इ.खोऱ्यांमधील जल नियोजनाबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल येईपर्यंत 'दमणगंगा-पिंजाळ' आणि 'पार-तापी-नर्मदा' या दोन्ही राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पांचा सामंजस्य करार अंतिम न करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) सदर पत्र शासनस्तरावर प्राप्त झाले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

'नार-पार-गिरणा-गोदावरी' लिंक या प्रकल्पाचा राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत सुधारीत अभ्यास करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याबाबत

(२८) ७८९८८ (१७-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'पार-तापी-नर्मदा' नदी जोड प्रकल्पा ऐवजी 'नार-पार-गिरणा-गोदावरी' लिंक या प्रकल्पाचा राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत सुधारीत अभ्यास करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता शासनाने केंद्राकडे प्रयत्न करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) अशी मागणी जुलै, २०१६ मध्ये मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांचे कडे झाली होती.

(२) नार, पार, औरंगा, अंबिका या पश्चिम वाहिनी नदयांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविणे बाबतच्या योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामास रूपये ३.६३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०१४ रोजी प्रशासकिय मान्यता दिली आहे. योजनेच्या सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पेनटाकळी येथील उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्याबाबत

(२९) ७९२९९ (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम विदर्भातील प्रकल्पांनी अदयापी जलसाठयाची उपेक्षीत पातळी गाठलेली नसल्याने येथील नळगंगा प्रकल्पात केवळ १३ दलघमी इतकाच जलसाठा आहे, सरासरीच्या तो १८ टक्के आहे, पेनटाकळीत ६७ पैकी १५ दलघमी जलसाठा आहे त्यामुळे २५ टक्यावर पातळी न गेल्याने या जिल्हयातील पाणीसंकट कायम राहणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेनटाकळीत येथील उपलब्ध जलसाठयाचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) व (२) दिनांक १७.०९.२०१६ रोजी नळगंगा प्रकल्पात. १३.६५ द.ल.घ.मी.(१९.६९ टक्के) व पेनटाकळी प्रकल्पात १४.३३ द.ल.घ.मी.(२३.८९ टक्के) पाणीसाठा उपलब्ध झाला होता.

तथापि दिनांक १५.११.२०१६ रोजी नळगंगा प्रकल्पात २८.७३ द.ल.घ.मी. (४१.४५ टक्के) व पेनटाकळी प्रकल्पात २९.१२ द.ल.घ.मी. (४८.५६ टक्के) पाणीसाठा उपलब्ध झाला होता.

उपलब्ध साठ्यानुसार प्रकल्पाचे कालवा सल्लागार समितीचे बैठकीत ठरल्यानुसार, रब्बी हंगामाचे नियोजन करण्यात आले व त्या नियोजनानुसार रब्बी हंगामात एकुण ७७४६ हेक्टर प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कुकडी प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्याची झालेली दुरुवस्था

(३०) ७९५३९ (१७-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी प्रकल्पाच्या एकूण सिचंन क्षेत्रापैकी २४५६२ हेक्टर क्षेत्र सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील असून कुकडी प्रकल्पाच्या डावा मुख्य कालावा कि.मी. १४० पासून पुढे १०० कि.मी. मध्ये कॉंक्रिट अस्तरिकरण न झाल्याने टेल करमाळा भागास पूर्ण क्षमतेने पाणी मिळत नाही तसेच कालव्याच्या प्रवाहामध्ये गवत, झाडे व गेटची मोडतोड व नादुरुस्ती झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जावून करमाळा तालुक्यातील दुष्काळी भागास पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तृतीय सुधारित प्रकल्प अहवाल सन २०१४ पासून शासन मंजूरी अभावी कोणतेही कॉंक्रिट अस्तरिकरणाचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) अंशत: खरे आहे. कुकडी डावा कालवा हा अस्तरीकरणासह संकल्पित केला असून कि.मी. १४० चे पुढील मुख्य कालव्याची अस्तरीकणाची कामे अपूर्ण असल्याने या कालव्यातून संकल्पित विसर्ग प्रवाहित होत नाही. तथापि, या कालव्यातून कि.मी. २३८ पर्यंत पाणी देण्यात येते. तसेच, कि.मी. १७८ पुढील भागातील कामे होवून १५-१६ वर्षाचा कालावधी झालेला असून कालवा, शाखा कालवे वितरण व्यवस्था व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत न झाल्याने व देखभाल दुरुस्ती अभावी कालव्यामध्ये गाळ साचुन झाडे झुडपे वाढली आहेत.

(२) होय,

(३) व (४) कुकडी प्रकल्पाच्या मंजुर सुधारीत प्र.मा. किंमतीपेक्षा जादा खर्च झाल्याने प्राप्त अनुदान प्रकल्पाच्या कामावर खर्च करण्यास अनुमती नाही. कुकडी प्रकल्पाचा तृतीय सुधारित प्रकल्प अहवाल सन २००८ मध्ये शासनास सादर केलेला होता. सदर प्रकल्प अहवालावरील उपस्थित शेऱ्यांची पुर्तता करून शासनास अद्ययावत अहवाल सादर झाला आहे. सद्य:स्थितीत

सदरचा सुधारित प्रकल्प अहवाल राज्य तांत्रिक सल्लागार समिती क्र.२, पुणे, यांच्याकडे पाठविण्यात आला असून समितीने उपस्थित केलेल्या शे-याची पूर्तता क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

जायकवाडी धरण (ता.पैठण, जि.औरंगाबाद) येथील पाणी साठ्याची दोन अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिल्याबाबत

(३१) ७९७७० (१५-०४-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणातील उपलब्ध जलसाठ्याबाबत अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता या दोन अधिकाऱ्यांनी मेंढीगिरी समितीस वेगवेगळी माहिती दिल्याने कोणती माहिती खरी मानावयाची या बाबत नागरिकांमध्ये संभ्रम असून सुमारे ४० टी.एम.सी. पाण्याच्या साठ्याबाबत गैरकारभार झाल्याचा सकृतदर्शनी दिसत असून पाणीवापर संस्थांनी पाणी सोडण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेळगाव (जि.जळगाव) बॅरेज प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबत

(३२) ७९८०२ (१७-०४-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील शेळगाव बॅरेजला नवीन १९९ कोटींची सुप्रमा मंजूर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बॅरेजचे काम तांत्रिक बाबी पूर्ण करून तात्काळ सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय. दि.३०/११/२०१६ रोजी शेळगाव बॅरेज प्रकल्पास रू.६९९.४८ कोटी (दरसूची २०११-१२) इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) शेळगांव प्रकल्पाच्या तांत्रिक बाबीसाठी शासनाच्या आदेशानुसार राज्य तांत्रिक समितीचा अहवाल अंतिम करण्यात आला असून, राज्य तांत्रिक सल्लागार समिती मार्फत शासनास पत्र क्र. रातांसस/कक्ष-१(अवप्रकिं)/(धा.क्र.५८/२०१७)/४४९/२०१७, दि.१२/०४/२०१७ अन्वये मान्यतेसाठी सादर झाला आहे. सदर अहवाल शासनाने दि.१९/०४/२०१७ च्या पत्रान्वये स्वीकृत केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे धाड (जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या परिसरातील तलाव क्षेत्रात संरक्षण भिंत बांधण्याबाबत

(३३) ७९९८५ (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धाड (जि.बुलढाणा) या ठिकाणी औरंगाबाद मार्गावर जिल्हा परिषद शाळेपासून काहीच अंतरावर करडी धरणाचे पाणी येत असल्यामुळे विद्यार्थांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व गाव तलावाकाठी असल्याने शाळेच्या दृष्टीने पाटबंधारे विभागाने रस्ता व शाळा परीसर तलाव क्षेत्रात संरक्षण भिंत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बावनथडी प्रकल्पाचे पाणी सोरणा मध्यम प्रकल्पामध्ये सोडव्याबाबतचा प्रस्ताव मंजुर करण्याबाबत

(३४) ८०४८० (२०-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावनथडी प्रकल्पाचे पाणी सोरणा मध्यम प्रकल्पामध्ये सोडावयाचे प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) बावनथडी प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील जमीनीचे २०० हे. चे वर शहरीकरण झाल्यामुळे तसेच ५८५ हे. जमीन औष्णीक वीज प्रकल्पाकरिता संपादीत केल्यामुळे बावनथडी प्रकल्पाचे लाभक्षेत्र कमी होणार असल्यामुळे २.२१ दलघमी पाण्याची बचत होणार आहे. मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर यांनी २.२१ दलघमी पाणी बावनथडी प्रकल्प पूर्ण संचय पातळीवर असेल तेव्हा खरिप हगांमाकरिता सोरणा प्रकल्पास बावनथडी प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्याच्या सा.क्र.१६५०० मी. वरुन भरण कालव्याव्दारे देण्यास दि.१७/०५/२०१६ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

या अनुषंगाने सोरणा भरण कालवा बांधकामाचा १६९.६९ लक्ष किमंतीचा "विस्तार व सुधारणा" अंतर्गत प्रस्ताव महामंडळाचे दि.१०.०१.२०१७ च्या पत्रान्वये प्रशासकिय मान्यतेसाठी शासनास प्राप्त झाला आहे.
(२) शासनस्तरावर प्रस्तावाची छाननी प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील कुंद्राळा मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(३५) ८०७३३ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील कुंद्राळा मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्यामुळे धरण पूर्ण क्षमतेने भरल्यानंतरही सिंचन क्षेत्रातील शेतकऱ्यांना अद्याप पाणी मिळत नसल्याने रब्बी हंगामात शेतकऱ्यांना पिक घेता न आल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आह काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार प्रकल्पाच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

या प्रकल्पाची दुरुस्ती कामे RRR व विशेष दुरुस्ती अंतर्गत करण्यात आली आहेत. विशेष दुरूस्ती कामांची गुणवत्ता चाचणी गुणनियंत्रण यंत्रणेमार्फत करण्यात आली असून

RRR अंतर्गत दुरुस्ती कामे तृतीय पक्षीय यंत्रणेमार्फत तपासली आहेत. त्यानुसार कामांचा दर्जा योग्य आहे. दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या उपयुक्त पाणी साठयानुसार या प्रकल्पाचा वास्तववादी प्राथमिक सिंचन कार्यक्रम तयार करण्यात आलेला होता. या कार्यक्रमानुसार सन २०१६-१७ च्या रब्बी हंगामासाठी वास्तववादी सिंचन ८०० हे. प्रस्तावित केले होते. रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार डाव्या कालव्याच्या ४५०० मी. पर्यंत व उजव्या कालव्याच्या ४१०० मी. पर्यंत पाणी देण्यात आले. या प्रकल्पाच्या दोन्हीही कालव्यावर पाणी वापर संस्था स्थापन झालेल्या असून पाणी वापर संस्थेच्या मागणीनुसार आवश्यक लांबीमध्ये पाणी सोडून रब्बी हंगामात ५८० हेक्टर सिंचन झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील पाटपाण्याखालील सिंचन क्षेत्र वाढविण्याबाबत

(३६) ८०८०८ (१५-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील पाटपाण्याखालील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी जलसंपदा विभागाने जलाशय, नदी अशा कालवा लाभक्षेत्रातील विहिरीच्या सिंचन क्षेत्राचाही समावेश करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाटपाण्याचा अप्रत्यक्ष लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या विहिरीच्या पाण्यावर पिकविलेल्या शेतीपिकाच्या पाणी वापराचे हमीपत्र दयावे लागणार आहे या निर्णयामुळे शेतीवरही जाचक बंधने येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व स्त्रोतातून सिंचित क्षेत्राचा तपशील एकत्रित करण्यासाठी कालव्याच्या लाभक्षेत्रात कालव्याव्दारे, नदीवरील उपसा व विहिरीवरील सिंचित क्षेत्राचे मूल्यांकनासाठी शासन परिपत्रक क्रमांक २०१६/(५९१/१६)/सिंव्य(धो), दि.२२/११/२०१६ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंतरगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील लघु पाटबंधारे विभागातंर्गत बांधण्यात आलेल्या तलावाच्या कालव्याच्या दुरुस्तीबाबत

(३७) ८१३६८ (१५-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंतरगाव (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील लघु पाटबंधारे विभाग अंतर्गत असलेल्या तलावा कालव्याचे बऱ्याच वर्षापासून देखभाल दुरुस्ती नसल्याने अंतरगाव-पालोती शिवारातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळत नसल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावातुन कालव्याव्दारे अंतरगाव व पालोती शिवारातील शेतकऱ्यांना सिंचनाकरिता पाणी सोडले जात असून दहा कि.मी. पर्यंत कालव्याचे बांधकाम करण्यात आले आहे परंतु संबंधीत अधिकाऱ्याच्या दुर्लक्षामुळे व कालव्याच्या दुरुस्ती अभावी शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालव्याच्या दुरुस्तीकरीता निधी देण्याबाबत व कालव्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

अंतरगाव प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये अतंरगाव व पालोती या गावांना कालवा व वितरण प्रणालीच्या दुरूस्ती अभावी अंशत: सिंचनाकरीता पाणी मिळते.

(२) देखभाल व दुरूस्तीच्या अपूऱ्या निधीमुळे आवश्यक दुरूस्ती अभावी प्रकल्पाच्या शेवटच्या भागात पाणी पोहचत नाही, हे खरे आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांना पाणी सिंचनासाठी मिळत नाही, हे खरे नाही.

(३) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.देवदु २०१५/(८३६/२०१५) सिंव्य (कामे), दि.१७.११.२०१६ अन्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पाचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे. तसेच पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार देखभाल दुरूस्तींच्या कामांना आवश्यकतेनुसार महामंडळाकडून निधी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगणघाट (जि. वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेजचे काम प्रलंबित असल्याबाबत

(३८) ८१४४५ (१५-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) तालुक्यातील आजनसरा बॅरेजचे काम सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बॅरेजचे काम किती कालावधीत सुरु करण्यात येणार आहे व यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) प्रकल्पास लागणाऱ्या पर्यावरण मान्यता व वनजमीन मान्यता मिळणेबाबतची कार्यवाही सुरु असुन वनजमीनीस अंतीम मान्यता तसेच प्रकल्पास पर्यावरण मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे कामे सुरु करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पास सन २०१७-१८ या वर्षात रु. ०.१० कोटीची अर्थसंकल्पिय तरतूद केली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

निम्न वर्धा प्रकल्पा अंतर्गत येरेली (ता.धामणगाव, जि.अमरावती) या पुनर्वसित गावाला नागरी सुविधा देण्याबाबत

(३९) ८१७१२ (१८-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निम्न वर्धा प्रकल्पा अंतर्गत येरेली (ता.धामणगाव, जि.अमरावती) या पुनर्वसीत गावाचे पुनर्वसन ठिकाणी नागरी सुविधांची कामे करण्याच्या मागणीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प वर्धा यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने येरेली या पुनर्वसीत ठिकाणी नागरी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) होय, खरे आहे.
(२) पुनर्वसित गावठाण येरली येथील बाजार ओटे व स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता वगळता १८ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली आहेत व गावं स्थलांतरीत झालेले आहे.

बाजार ओटे व स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता जून, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

प्राप्त निवेदनातील मुद्याप्रमाणे वाढीव गावठाणाकरिता जागा मंजुर करण्यात आली असुन सुधारित अभिन्यास नकाशा तयार करण्याची कार्यवाही राजस्व विभागामार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

शहानुर धरणातून शेतीला पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याबाबत

(४०) ८१७४० (२०-०४-२०१७). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी येथील शहानुर धरणातून कालव्याद्वारे शेतीला पाणीपुरवठा होत नसल्यामुळे पाईप लाईन द्वारे पाणीपुरवठा करण्याबाबत मागणी मा.मंत्री महोदयांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहानुर धरणाची साठवण क्षमता ४७ द.ल.घ.मी.आहे, ९००० हे. सिंचन क्षमता असून केवळ ७०० हे. सिंचन होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंजनगाव सुर्जी येथील शहानुर धरणातून ९००० हे. पूर्ण सिंचन पूर्णता पाईप लाईनद्वारे होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय.

(२) नाही.

सन २०१६-१७ मध्ये शहानूर धरणाची उपयुक्त साठवण क्षमता ४६.०४ द.ल.घ.मी.आहे व सिंचन क्षमता ७५२४ हे. आहे. सन २०१६-१७ मध्ये एकूण ३६४४ हे. सिंचन झालेले आहे.

(३) विशेष बाब म्हणून प्रायोगीक तत्वावर सुर्जी वितरीकेवरुन निर्गमीत होणाऱ्या सातेगांव लघुपाट क्र.१ ची पारंपारीक कालवा वितरण प्रणाली पाईपलाईनव्दारे करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्तावाची तांत्रिक छाननी शासन स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केज व अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील अनेक गावातील विविध प्रकल्पासाठी अनेक शेतकऱ्यांची संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

(४१) ८१८१२ (१५-०४-२०१७). श्रीमती संगीता ठोंबरे (केज) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज व अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील अनेक गावातील जलसंपदा विभागाच्या विविध प्रकल्पासाठी अनेक शेतकऱ्यांची हजारो हेक्टर जमीन ३५ वर्षापूर्वी संपादित करण्यात आल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तालुक्यात आतापर्यंत विविध प्रकल्पांसाठी संपादित केलेल्या जमिनीच्या कोणत्याही प्रकारचा मोबदला शेतकऱ्यांना दिला गेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) केज व अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अनुक्रमे ९३२.१८ हेक्टर व ६७४.०९ हेक्टर जमीनी विविध प्रकल्पासाठी संपादित केल्या आहेत. परंतु ३५ वर्षांपूर्वी संपादित केलेल्या जमीनीचे प्रकरण भूसंपादनाच्या निवाडयाची रक्कम अदा करणेसाठी प्रलंबित नाही.
(२) व (३) पाटबंधारे प्रकल्पाच्या भूसंपादन प्रकरणाच्या प्राधान्यक्रमानुसार निधी वितरीत करण्यात आलेला आहे व येत आहे. उपरोक्त दोन्ही तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादन अधिनियम-१९८४ मधील कलम-१८ वाढीव मोबदला रक्कम रुपये ४८.१६ कोटी अदा करणे प्रलंबित आहे. प्राधान्यक्रमानुसार निधी वितरणाची कार्यवाही चालू आहे.
(४) भूसंपादन प्रस्तावाचा प्राधान्यक्रम व उपलब्ध निधीनुसार निधी वितरीत करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवर अस्तीत्वात असलेल्या को.प.बंधाऱ्याचे कालव्यामध्ये रुपांतर करण्याबाबत

(४२) ८२१२२ (२०-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील पैनगंगा नदीवर अस्तीत्वात असलेल्या कोल्हापूर बंधाऱ्याचे बॅरेजेस मध्ये रुपांतर करण्यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री यांच्या दालनात दिनांक २९ डिसेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन कोल्हापूर बंधाऱ्याचे कालव्यामध्ये रुपांतर करण्यासाठी आवश्यक पाणी उपलब्ध असल्यामुळे येवती, मसलापेन, भापुर, आसेगांव पेन, बाळखेडा, धोडप खु. या को.प.बांधाऱ्यापैकी दोन कोल्हापूर बंधाऱ्याचे रुपांतर कालव्यामध्ये करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावित दोन कोल्हापूर बंधाऱ्याचे कालव्यामध्ये रुपांतर करण्यासंदर्भातच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) : (१) होय.

दिनांक २१.१२.२००९ रोजी मा.मंत्री जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली, विधान भवन, नागपूर येथे बैठक झाली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रायोगिक तत्वावर दोन को.प. बंधाऱ्याचे रूपांतर बॅरेजेसमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

(३) को.प बंधाऱ्याचे रूपांतर बॅरजेस मध्ये करण्याचे सदर बैठकीत निर्देश दिले होते. परंतु त्यास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त होऊ शकत नसल्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उपसा सिंचन योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

(४३) ८२४८७ (२०-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द प्रकल्पावर शेडी, सोमनाळा, आकोट, सुरेवाडा, करचखेडा, नेरला, व धारगाव येथे उपसा सिंचन योजनेला मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपसा सिंचन योजनेकरिता लागणारी जमीन संपादित करण्यात आली परंतु योजनाचे काम अजूनपर्यंत सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उपसा सिंचन योजनेचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय ?

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) गोसीखुर्द प्रकल्पातंर्गत खालील उपसा सिंचन योजना प्रस्तावित असून प्रकल्पास दिनांक २१/०९/२०१६ रोजी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

१. शेळी (सोमनाळा) उपसा सिंचन योजना

२. आकोट उपसा सिंचन योजना

३. नेरला उपसा सिंचन योजना

४. सुरेवाडा उपसा सिंचन योजना व करजखेडा उपसा सिंचन योजना वैनगंगा नदीवर प्रस्तावित असून दोन स्वतंत्र योजनांना प्रशासकिय मंजूरी प्राप्त आहे.

धारगांव उपसा सिंचन योजना ही स्वतंत्र योजना आहे. सदर योजना सद्य:स्थितीत अन्वेषणाधीन असून सदर योजनेस प्रशासकिय मान्यता प्राप्त नाही.

(२) व (३) शेळी (सोमनाळा) व आकोट उसिंयो चे काम हाती घेण्यांत आले आहे.

१. नेरला उसिंयो च्या उर्ध्वनलिका व पंपहाऊस करीता १४.६४ हे. जमिनीची आवश्यकता असून सदर क्षेत्र संपादीत करण्यात आले आहे. तसेच कालवे व वितरणप्रणाली करिता ७५१.५२ हे. जमीनीची आवश्यकता असून आतापर्यंत ४७५.३२ हे. जमीन संपादीत केलेली आहे. सदर योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत.

२. सुरेवाडा उसिंयोच्या उर्ध्वनलिका व पंपहाऊस करिता ९.४० हे. जमीनीची आवश्यकता असून

४.१७ हे. जमीन संपादीत करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाला वन जमीनीची अडचण असून वन प्रस्तावास अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येईल.
३. करजखेडा :- योजनेचे पंपहाऊस, रायझींगमेन ची कामे पूर्ण होऊन योजना कार्यान्वित झाली असून या व्दारे सिंचन सुरु आहे. मुख्य कालव्याची ९०% कामे पूर्ण झाली असून लघु कालव्यांची कामे सुरु आहेत.
४. धारगांव उसियो ही अन्वेषनाधीन असून यासाठी जमीन संपादीत केलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रकल्पग्रस्तांची सुरक्षारक्षक पदावर नियुक्ती करण्याबाबत

(४४) ८२५०५ (१८-०४-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोसीखुर्द प्रकल्पावर कार्यरत सुरक्षा रक्षकांनी कामावर ठेवण्यासाठी औद्योगिक न्यायालयात दाद मागितली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरण औद्योगिक न्यायालयात न्यायप्रविष्ठ असताना दिनांक ३ मार्च, २०१६ ला सुरक्षा रक्षकाच्या बाजूने निर्णय दिला असतानासुद्धा दिनांक १० मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता यांनी सुरक्षा रक्षक पुरविण्याचा वर्क ऑर्डर एका कंपनीला दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार प्रकल्पग्रस्तांचा सुरक्षा रक्षकांमध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०६-०७-२०१७) : (१) होय.
(२) अशंत: खरे आहे,

औद्योगिक न्यायालयाने सुरक्षा रक्षकांच्या बाजुने दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी अंतरीम निर्णय दिला होता, तथापि त्याविरुध्द कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द धरण विभाग, वाही मार्फत उच्च न्यायालयाने अपिल दाखल करण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयाने दिनांक ५.८.२०१६ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे धरणावर काम करणा-या सर्व सुरक्षा रक्षकांची सन २००७ पासून जेष्ठता यादी तयार करून आवश्यकतेनुसार स्थानिक व प्रकल्पग्रस्तांना सुरक्षा रक्षकांचे कामावर घेण्याचे कंत्राटदारास निर्देश दिले आहे.
(३) गोसीखुर्द प्रकल्पावर खाजगी कंत्राटदारांनी लावलेल्या २४ सुरक्षा रक्षकांनी औद्योगिक न्यायालय, भंडारा येथे दाखल प्रकरण क्र ५३/१४ चे निर्णयाचे अनुषंगाने विभागाने मा.उच्च न्यायालयात दाखल प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सन २००७ पासून प्रकल्पावर काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांची जेंष्ठतासूची तयार करुन जेष्ठतेनुसार कामावर घेण्याबाबत संबंधित कंत्राटदारास निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या निर्देशानुसार

सुरक्षारक्षकांना चालू करारनाम्या अंतर्गत सुरक्षेचे कामाकरीता कंत्राटदारामार्फत कामावर घेण्यात आले होते. कंत्राटदाराचा करारनामा संपुष्ठात आल्याने कंत्राटदाराने दिनांक ३.२.२०१७ पासून सुरक्षा रक्षकांना कामावरुन कमी केले आहे. पुढील कालावधीसाठी सुरक्षा रक्षक पुरवठा करुन घेणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गडनदी प्रकल्पातंर्गत तयार करण्यात येणाऱ्या रस्त्याचे काम करण्याबाबत

(४५) ८३३६३ (१८-०४-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गडनदी प्रकल्पातंर्गत तयार करण्यात येणाऱ्या येडगेवाडी रस्त्याचे (रिंग रोडचे) काम अडवून बंद करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिंगरोड अभावी ग्रामस्थांची दळणवळणाची गैरसोय होणार असून सदर रस्त्याचे काम तातडीने सुरू होणेच्या मागणीसाठी संबधीत ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त रस्त्याचे काम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय.

(२) होय.

(३) येडगेवाडी गावठाण धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेर येत असून खास बाब म्हणून पुनर्वसनाच्या मागणीला अनुसरून दि. २९/११/२००५ रोजी मा. जलसंपदा मंत्री, डॉ. भारत पाटणकर व प्रकल्पग्रस्त यांच्या बैठकीत येडगेवाडी गावठाणाचे पुनर्वसन करण्याऐवजी जलाशयाच्या बाजूने रस्ता (रिंगरोड) देण्याचा निर्णय झाला. त्यानुसार येडगेवाडी प्रकल्पग्रस्तांसाठी व धरणाच्या वरील बाजूच्या गावठाणाकरिता उजवा रिंगरोड कि.मी. १ ते १५ चे खडीकरण पूर्ण झालेले आहे. या पैकी कि.मी. १ ते ९ चे डांबरीकरण पूर्ण झाले असून, उर्वरित कि.मी. १० ते १५ मधील डांबरीकरणाचे काम २०१७ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गुळ मध्यम प्रकल्पाच्या (ता.चोपडा, जि.जळगांव) शेतचारा बांधण्यासाठी निधी मिळण्याबाबत

(४६) ८३६८० (१८-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील गुळ मध्यम प्रकल्पाच्या (ता.चोपडा, जि.जिळगांव) शेतचा-या बांधण्यासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रुपये ७.०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा राज्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विभाग, जळगांव, व संबंधित अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधिंसमवेत दिनांक ०४ मार्च, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत शेतचा-यांएवेजी बंदिस्त पाईप लाईन करण्याबाबत शासन निर्णय झाल्यानंतर सदर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्याचे निश्चित करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी तरतूद करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाच्या शेतचा-यासाठी तात्काळ निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) होय.

(२) होय. तथापि शासनाने नलिकेद्वारे वितरण प्रणाली बाबत शासन परिपत्रक क्र. सिंचन/२०१५/प्र.क्र.२४/भाग-२/२०१५/जसं/धोरण, दि.०२/०२/२०१७ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील मुद्दा क्र.२ नुसार मोठ्या व मध्यम प्रकल्पामध्ये वितरिका/लघु वितरिकांसाठी बंदिस्त वितरण प्रणाली प्रमाणे काम करावे असे नमुद आहे. शेतचाऱ्यांसाठी बंदिस्त पाईप वापराबाबत शासनाचे धोरण नाही.

(३) सदर प्रकल्पाचा समावेश सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात अवशिष्ठ कामांमध्ये करण्यात आला आहे. मात्र त्यात बंदिस्त पाईपमधील शेतचारी कामाचा समावेश नाही.

(४) प्रचलित पध्दतीनुसार व उपलब्ध निधीच्या अधीन राहून शेतचाऱ्यांची कामे करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पिंपळगांव शिवारातील धरणाच्या कालव्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

(४७) ८३७२४ (१८-०४-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील पिंपळगांव शिवारातील धरणाच्या कालव्याच्या कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) हे खरे नाही.

खडकपूर्णा प्रकल्पावरील देऊळगांव राजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे पिंपळगांव बु.शिवारातील धरणाच्या कालव्याच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नर्मदा जल लवाद आयोगाच्या निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्यास आलेले १०.८९ अ.घ.पू. पाण्यापैकी नर्मदा खोऱ्यातील ५.५९ अ.घ.पू. पाणी तापी खो-यात वळविण्याबाबत

(४८) ८४०१६ (२०-०४-२०१७). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नर्मदा जल लवाद आयोगाच्या निवाड्यानुसार महाराष्ट्राच्या वाट्यास आलेले १०.८९ अ.घ.पू पाण्यापैकी नर्मदा खोऱ्यातील ५.५९ अ.घ.पू. पाणी तापी खोऱ्यात वळविण्यासाठी शासनाने प्रकल्पाच्या सविस्तर सर्वेक्षणाच्या रु.१२ कोटी ९१ लाख १९ हजार ५०० किमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ९ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सरोवर प्रकल्पग्रस्तांना सिंचन सुविधा पुरविण्यासाठी उकाई धरणातून उपलब्ध होणारे ५ अ.घ.पू. पाणी उपसा सिंचनाव्दारे उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाचा संभाव्यता अहवाल' तयार करण्याच्या क्षेत्रीय स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, नर्मदा खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाट्यास आलेल्या १०.८९ अ.घ.पू. पाण्यापैकी ५.५९ अ.घ.पू. पाणी नंदूरबार जिल्ह्यातील तापी खो-यात वळविण्याकरिता नर्मदा तापी वळण योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राज्यस्तरिय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या सल्ल्याने करावयाच्या अंतिम कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व याबाबतचा बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०३-०७-२०१७) : (१) होय.

(२) उकाई धरणातील ५ टीएमसी पाणी वापराबाबत महाराष्ट्र राज्याच्या हद्यीत नंदुरबार जिल्हयातील नंदुरबार, शहादा, तळोदा, अक्कलकुवा व नावपूर तालुक्यातील गावांचे तापी नदी लगतचे क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. सदर ५ टी.एम.सी. पाण्यामध्ये २५० हेक्टर प्रती दलघमी या नुसार साधारणत: ३५००० हेक्टर क्षेत्र उपसा सिंचनाखाली येवू शकते. सदर ३५००० हे. क्षेत्रामध्ये ५०० ते ७०० हेक्टर प्रती स्किम या नुसार साधारणत: ५ टीएमसी पाण्याचा वापर करुन राबविता येणे शक्य होणार आहे. त्यानुसार पूर्वसंभाव्यता अहवाल (Pre feasibility Report) तयार करण्याचे काम विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.

(३) राज्य तांत्रिक सल्लागार समितीने नर्मदा तापी वळण योजनेअंतर्गत असलेल्या शेलकुई, जलोला व गोपालपुरा या धरणस्थळी घेतलेल्या विंधन विवरांव्यतिरीक्त अतिरिक्त विंधन विवरे (Bore Holes) घेण्याबाबत शेरा उपस्थित केला असून सदर विंधन विवरे घेण्याच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.
(४) वरीलप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील उर्ध्व प्रवरा उजवा कालवाच्या कामास निधीसह निविदा काढण्याबाबत

(४९) ८४४०९ (१८-०४-२०१७). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील उर्ध्व प्रवरा उजवा कालवा कि.मी.१९ ते ८४ मधील कामास निधी मिळावा व कि.मी.८५ ते ९७ या कामाची निविदा काढणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने सदर कालव्याच्या कामास निधीसह निविदा काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०४-०७-२०१७) : (१) माहे जून २०१५ व फेब्रुवारी २०१६ या कालावधीमध्ये कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अशा आशयाची निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(२) उर्ध्व प्रवरा प्रकल्प, (निळवंडे-२) ता.अकोले, या प्रकल्पास मंजूर तृतिय सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक खर्चास उपलब्ध असलेला निधी एक विशेष बाब म्हणून सुप्रमाचे अधीन खर्च करण्यास दिनांक २२/३/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.

प्रकल्पांच्या कालव्यांची कामे धरणापासून सलगतने पूर्ण करणेचे नियोजन आहे. ऊर्ध्व प्रवरा डावा कालवा १ ते २० मधील कामे प्राधान्याने पूर्ण करणेचे नियोजन आहे. त्याचबरोबर ऊर्ध्व प्रवरा उजवा कालवा किमी ८४ पर्यंतची कामे पूर्ण करण्याचे नियोजन असून ही कामे अंतिम टप्प्यात येताच निधीच्या उपलब्धतेनुसार किमी ८५ ते ९७ मधील कामांची निविदा कार्यवाही करणेचे नियोजित आहे. सद्यस्थितीत किमी ८५ ते ९७ मधील अंदाजपत्रके तयार करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच प्रकल्पाचा रुपये २४६९.१४ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

हडोळती व परिसरातील या धरणामधून उपसा सिंचन योजना सुरु करण्याच्या मागणीबाबत

(५०) ८४४४० (२०-०४-२०१७). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपूर परीसरातील लिबोटी (ता.लोहा, जि.नांदेड) येथील धरणात सदर धरणातील पाण्याखाली अहमदपूर मोठे क्षेत्रे व्यापलेले आहे, परंतु अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी सदर धरणातील पाण्याचा फारसा उपयोग होत नसल्याने हडोळती व परिसरातील या धरणामधून उपसा सिंचन योजना सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर योजना मंजुरीसाठी शासन त्वरित कारवाई करणार असे दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आश्वासन देवून सुद्धा काहीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन (०५-०७-२०१७) : (१) होय.

(२) नाही. लोकप्रतिनीधींकडून प्राप्त निवेदन डिसेंबर, २०१५ मधील आहे. या निवेदनावरील "तपासून अहवाल सादर करावा" या मा. जलसंपदा मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार, प्रकल्पाच्या मंजूर जलनियोजनानुसार पाणी शिल्लक नसल्याने प्रस्तुत उपसा सिंचन योजना राबवणे तांत्रिकदृष्ट्या शक्य होणार नाही. असा अहवाल क्षत्रिय अधिकऱ्यांकडून शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.